## इयत्ता ५वी    परिसर अभ्यास २    वार्षिक परीक्षा प्रश्नपत्रिका उत्तर पत्रिका    गुण २०

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.** ३

१. नवाश्मयुगात संपूर्ण गाव हे एक **विस्तारित** कुटुंब होते.
२. मध्यप्रदेश या राज्यात **भीमबेटका** येथे पुराश्मयुगीन गुहाचित्र आहेत.
३. हडप्पा संस्कृती **सिंधू** नदीच्या खोऱ्यात विकसित झाली.

२. **दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (फक्त ३)** ६

१. संस्कृती म्हणजे काय?
उत्तर - विविध कलाकौशल्य आणि परंपरा यांचे अनेक पिढ्यांकडून मिळालेले ज्ञान आणि त्या ज्ञानाच्या आधारे निर्माण झालेली जीवन पद्धती म्हणजे संस्कृती होय.

२. मानवाने तांबे हा धातू का वापरायला सुरुवात केली?
उत्तर - सोने निसर्गतः अत्यंत नरम धातू असल्यामुळे त्याचा उपयोग हत्यारे, अवजारे बनवण्यासाठी करता येण्यासारखा नव्हता. सोन्यानंतर माणसाला तांबे या धातूचा शोध लागला व त्या तांबे या धातूचा मानवाणे वापर करायला सुरुवात केली.

३. बुद्धिमान मानवाला हत्यारांची आवश्यकता का होती?
उत्तर - मध्याश्मयुगातील बुद्धिमान मानवाला शिकार, मासेमारी, कापणी, तोडणी अशा अनेक प्रकारच्या कामांसाठी हत्यारांची आवश्यकता होती.

४. मध्याश्मयुगात मानवी जीवनपद्धती का बदलू लागली होती?
उत्तर - मध्याश्मयुगात हवामान आणि पर्यावरणातील बदलामुळे मानवी जीवनपद्धती बदलू लागली होती. (पाठ क्र. ०६)

३. **टिपा लिहा.** ४

१. त्रियुग पद्धती
उत्तर - युरोपमधील संग्रहालयांमध्ये जमा झालेल्या पुराणवस्तूंच्या संग्रहांचे वर्गीकरण करण्यासाठी ख्रिश्चन थॉमसेन नावाच्या अभ्यासकाने 'त्रियुग पद्धती' नावाची पद्धत अमलात आणली. त्याने त्या वस्तूंची वर्गवारी तीन गटांमध्ये केली. १. दगडाची हत्यारे - अश्मयुग २. तांब्याची हत्यारे आणि इतर वस्तू - ताम्रयुग ३. लोखंडाची हत्यारे आणि इतर वस्तू - लोहयुग

२. नवाश्मयुगीन घरांची रचना
उत्तर - नावाश्मयुगाच्या सुरुवातीला कुडाची घरे बांधली जात होती. काही काळानंतर कच्च्या विटांची चौकोनी घरे बांधली जाऊ लागली. काही घरांमध्ये एकापेक्षा अधिक खोल्या बांधत. दोन घरांमध्ये फारसे अंतर नसायचे. हवामानाच्या स्थानिक वैशिष्ट्यांना अनुसरून घरांच्या बांधणीत स्थानिक बदल आढळतात.

४. **दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (फक्त १)** ३

१. एखादी प्राणिजात माणसाळविण्याच्या प्रक्रियेच्या तीन मुख्य पायऱ्या कोणत्या?

उत्तर - नावाश्मयुगाच्या एखादी प्राणिजात माणसाळविण्याच्या प्रक्रियेच्या तीन मुख्य पायऱ्या -

1. रानटी जनावरांना पकडून ताब्यात घेणे.
2. त्या जनावरांना माणसासोबत राहण्याचे वळण लावणे.
3. त्यांच्यापासून दूधदुभते इत्यादी पदार्थ मिळवणे आणि त्यांच्याकडून कष्टाची कामे करून घेणे.

२. खालील आकृती पूर्ण करा.

उत्तर -

